# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

पहिला मजला, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, खेरवाडी,
अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०० ०५१
फोन नं - २६४७ ४८९२ / २६४७ १६१९
ईमेल — jtdirrom@gmail.com     Web site : http://mumbai.dte.org.in


---

**तात्काळ**
कालमर्यादा : दि. 29/10/2016

क्रमांक : ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१६/ 3405

दिनांक : 24 OCT 2016

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानीत
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागावर्गीय विद्यार्थ्यांच्या <u>शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंगलबजावणीबाबत. . . . . . . . . . . . . . . .</u>

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि.३१/३/२०१६
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१६/२४६०, दि. ८/८/२०१६
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. १५/अर्थस/ईबीसी/प्रमाणपत्र/ २०१६-१७/८८, दि. ०६/०९/२०१६
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१६/२७०७, दि. ८/९/२०१६

वरील संदर्भांकीत विषयानुसार सर्व खाजगी विनाअनुदानीत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना कळविण्यांत येते की, संदर्भीय क्र.1 येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार सर्व संस्थांनी ईबीसीपात्र विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व उपस्थितीचा तपशिल ईबीसी ऑनलाईन पोर्टलवर अद्यावत करणे अनिवार्य आहे. असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही संस्थांनी त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच उपस्थितीचा तपशिल ईबीसी पोर्टलवर अद्यावत केलेला नाही. तरी याद्वारे सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांचा तपशिल दि. 29/10/2016 पर्यंत अद्यावत करावा.

या कार्यालयाच्या संदर्भीय क्र.2 च्या परिपत्रकान्वये सर्व संस्थांना कळविण्यांत आले होते की, विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, म्हणून एक विशेष बाब म्हणून ईबीसी प्रस्तावांच्या छाननी पश्चात सर्व संस्थांना ईबीसी पोर्टलच्या मेसेज बॉक्सद्वारे त्यांच्या प्रस्तावाच्या यादीची प्रत स्कॅन करुन पाठविण्यांत आलेली आहे. परंतु अद्यापही ब-याच संस्थांनी त्यांच्या त्रुटींची पूर्तता केलेली नाही. ही बाब अत्यंत खेदजनक आहे. ज्या संस्था दि. 29/10/2016

..2.

पर्यंत त्यांच्या त्रुटींची पूर्तता करणार नाहीत. अशा संस्थांतील त्रुटी काढलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज जरी मंजूर केले असले तरी ते नामंजूर करण्यांत येणार आहेत. याची त्रुटीपूर्तता न केलेल्या संस्थांनी गंभीर दखल घ्यावी.

दि. 29/10/2016 पर्यंत ज्या संस्थांनी त्रुटींची पूर्तता केलेली आहे व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व उपस्थितीचा तपशिल अचूकपणे अद्यावत केलेला आहे. तसेच ज्या संस्थांनी विद्यार्थ्यांचा आधार तपशिल अद्यावत केलेला आहे. अशा संस्थांनी सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार :

1. हमीपत्र,
2. प्री ॲडव्हान्स रिसिट,
3. NEFT फॉर्म,
4. दि. 08-09-2016 च्या परिपत्रकातील 7 मुद्यांचे प्रमाणपत्र
5. शैक्षणिक तपशिल व उपस्थिती अहवाल ऑनलाईन भरल्यानंतर ॲप्रूव्हड केलेली यादी तसेच जे विद्यार्थी 2 ड्रॉपमुळे रिजेक्ट झाले असतील त्यांची स्वतंत्र यादी जोडावी.
6. आधार तपशिल अपडेट केलेल्या विद्यार्थ्यांची शे-यासह यादी

ज्या संस्थांनी वरीलप्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण केलेली असेल अशाच संस्थांनी त्यांचे वरील कागदपत्रं सादर करावीत. ज्यांनी अद्याप त्रुटींची पूर्तता केलेली नाही व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व उपस्थितीचा तपशिल ऑनलाईन अद्यावत केलेला नाही, तसेच विद्यार्थ्यांचा आधार तपशिल अद्यावत केलेला नाही. अशा संस्थांनी जोपर्यंत वरील कार्यवाही पूर्ण होत नाही, तोपर्यंत उक्त नमूद कागदपत्रं सादर करु नयेत. सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता वरीलप्रमाणे कागदपत्रं सादर करणा-या संस्थांची कागदपत्रं दफ्तरी दाखल केली जातील. परिणामी विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस संस्था जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्राशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

संस्थेचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक (लेटर हेडवर )

प्रती,
सहसंचालक ,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
जागीतीक बँक इमारत , पहीला माळा, बांद्रे
मुंबई - ५१

विषय :- आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीसाठी हमीपत्र व ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीट पाठविणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, आपल्या कार्यालयाकडून आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रतिपुर्तीसाठी वितरीत करण्यात येत असलेल्या रकमेसाठीचे या संस्थेचे खालील प्रमाणे हमीपत्र आपणास सादर करीत आहे. तसेच सोबत ॲडव्हान्स स्टॅम्प रिसीट जोडून पाठवित आहे.

<u>हमीपत्र</u>

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन संस्थेस प्राप्त रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये ईसीएस प्रणालीद्वारे जमा करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र १५ दिवसाचे आंत सादर करण्याची हमी घेत आहे.

कृपया रक्कम संस्थेच्या सोबत जोडलेल्या खात्यामध्ये जमा करण्यात यावी , ही विनंती.

आपला ,

संस्थाप्रमुखाची सही / पदनाम
संस्थाप्रमुखाचे नांव

<u>ॲडव्हॉन्स स्टॅम्प रिसीट</u>

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचे कडून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीकरीता रक्कम रुपये ------------ (अक्षरी रूपये------------------------------------------------------------------------------) संस्थेस प्राप्त झाली .

रेवेन्यु स्टॅम्प व स्वाक्षरी
संस्थाप्रमुखाची सही / पदनाम
संस्थाप्रमुखाचे नांव

# संस्थेचे नांव व पत्ता व दुरध्वनी क्रमांक (लेटर हेडवर )

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१०१०/प्रक्र६८/कोषा/प्र-५ दि. १८/एप्रिल,२०११ चे सहपत्र

जोडपत्र - अ

ई सी एस /एन ई एफ टीं द्वारे प्रदाने प्राप्त कररण्यासाठीचा तपशील

१ मागणीदार/पुरवठादार /कंत्राटदाराचे
नांव / फर्मचे नांव / संस्थेचे नांव

२ कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी लागुआहे)

३ बँक खाते क्रमांक
४ बँक खात्याचा प्रकार
५ बँकेचे नांव
६ बँक शाखेचे नाव व पत्ता

७ बँक शाखेचा संकेतांक
८ एम आय सी आर क्रमांक
९ आय एफ एस सी संकेतांक

---

दिनांक कंत्राटदार /पुरवठादार /मागणीदाराची सही

---

बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की , वरील माहिती मी तपासून पाहीली असून ती योग्य आहे .

शाखा प्रमुख

------------------------------ (बँक शाखेचे नाव व शिक्का)

# संस्थेच्या लेटरहेडवर संस्थेने सादर करावयाचे प्रमाणपत्र

प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यांत येते की ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील :-

1. सर्व पालकांचे उत्पन्न रु. 1 लाखापेक्षा कमी आहे.
2. सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेले आहेत.
3. सर्व विद्यार्थी महाराष्ट्र  राज्याचे अधिवासी आहेत.
4. सर्व विद्यार्थी फक्त ईबीसी या योजनेचा लाभ घेत असून दुस-या कोणत्याही योजनेचा लाभार्थी नाही अथवा अर्ज सुध्दा केलेला नाही.
5. सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले असून त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेले आहे. तसेच पात्र विद्यार्थ्यांना ईबीसी रक्कम संस्थेकडून सदर खात्यात ईसीएसद्वारेच जमा करण्यांत येईल.
6. तसेच उच्च् व तंत्रशिक्षण विभागाचे दि. 31 मार्च, 2016 रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करुनच ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यांत आलेली आहे.
7. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थ्यांचे एस.एस.सी. पासून ते आतापर्यंतचे सर्व निकालांचा तपशिल व सत्रानिहाय उपस्थितीचा तपशिल ऑनलाईन पोर्टलवरील update academic details द्वारे update केला आहे.

संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी

(शिक्का)